REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# उपयोजित मराठी




डॉ. राजशेखर नळगे
जवाहर महाविद्यालय, अणदूर.

## प्रस्तावना :

मातृभाषा मराठी विचाराच्या आत्मप्रकटिकरणासाठी व सृजनात्मक लेखनासाठी सर्वात प्रभावी माध्याम म्हणून सर्वांनी मान्य केले आहे. अनेक इंग्रजी लेखकांनी आपल्या सृजनात्मक लेखनांची भाषा मातृभाषाच निवडल्या आहेत. शिक्षणाच्या कोणत्याही स्तरावर मातृभाषा शिक्षणाला पर्याय नाही, असा ठोस निर्वाळा शिक्षण तंज्ञानी दिला आहे. उच्च,तंत्र, वैद्यकीय व अभियांत्रीकी शिक्षणातील विशिष्ठ मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी व शिक्षणाचा सार्वत्रिक प्रचार करण्यासाठी मातृभाषा मराठीचाच पहिल्यांदा विचार होतो. मध्ययुगात नाथ, महानुभाव व वारकारी संप्रदायानी संस्कृत भाषेला नाकारुन लोकव्यवहारातील एक मराठी भाषेचा स्विकार केला आणि आपल्या धर्मग्रंथाची भाषा मराठी ठेवली हे आपणास ज्ञात आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी मातृभाषेच्या विकासासाठी घटनात्मक तरतूद करुन शासकीय व निमशासकीय प्रशासनाची व न्यायालयीन कामकाजाची भाषा मराठी असावी असे नोंदवीले आहे. संविधानात्मक व लोकमताची अनुकूलता मातृभाषेसाठी असताना मराठी भाषेचा उपयोग ज्या प्रकारे व्हायला पाहिजे तसे होताना दिसत नाही.

भाषा ही सर्वोपयोगी अशी एक सामाजिक संस्था आहे., भाषा आणि जीवन यांचे अत्यंत जवळचे नाते आहे. मानवी मनातील भाव-भावना आणि विचार विनिमयाचे कार्य भाषेद्वारेच होत आलेले आहे. जीवन जगत असताना समाजातील अनेक लोकांशी,संस्थांशी, शासकीय कार्यालयांशी संबंध येत असतो, त्यांना काही सांगावयाचेअसते, आपल्या मनातील भाव भावना व्यक्त करावयाचे असतात आणि हे सारे भाषेच्या माध्मातूनच करावयाचे असल्यामुळे भाषेतील शब्द, त्यांचा अर्थ आणि वाक्यरचना यांचा उपयोग करावा लागतो. आपल्या मनातील विचार संसुसंगत मांडण्यासाठी भाषेचा संस्कार महत्वाचा ठरतो. आज समाज जीवनाच्या बदलत्या प्रवहात भाषा अधिक संस्कारक्षम बनत चालली आहे. दैनंदिन वयवहार, शासन व्यवहार, व प्रचार माध्यमामध्येही भाषेचा उपयोग नित्य करावा लागतो. समाजाच्या विनिमय विषयक गरजा भागविण्याचे काम भाषा करते. ज्या प्रमाणात विनियमयाचे क्षेत्र व्यापक होत जाते, बदलत जाते त्या प्रमाणात भाषेचे स्वरुप ही बदलणे अपर्यायी असते. म्हणून शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांसाठी व्यकरणाचा आणि व्यवहार उपयोगी लेखनाचा काही भाग अभ्यासक्रमांत समाविष्ठ करण्यात आलेला असतो. मराठी ही मातृभाषा असूनही मराठी लिहीताना अनेकस्तरावर अनेक अडचणी येत असतात. मराठी विषयाच्या अभ्यासक्रमासाठी काही गद्य-पद्य उतारे निवडलेले असतात. या उताऱ्याच्या आधारे मराठी भाषेचा अभ्यास केला जातो. यापाठयपुस्तकाचा अभ्यास करुन विद्यार्थी अनेक शाखेतील पदवी प्राप्त करतात, परंतू खेदाची गोष्टही की, या पदवीधर बहुसंख्या विद्यार्थ्यांना जीवनात व्यवहारात उपयोगी ठरेल असे मराठी येत नाही.

मराठी भाषेचा दैनंदिन जीवनात चांगल्या प्रकारे उपयोग करता यावा म्हणून अलिकडील काळात अनेक विद्यापीठातील मराठी अभ्यास मंडळानी " उपयोजित मराठी " चा अभ्यासक्रमात समावेश केलेला दिसतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आदि विद्यापीठातून आज उपयोजित मराठी शिकवली जात आहे. यात विविध माध्यमासाठी लेखन कसे करावे, याचे सोदाहरण विवेचन केलेले असते. या संदर्भात नरेंद्र मारवाडे यांचे "वस्तुनिष्ठ आकलन व उपयोजीत मराठी लेखन " या पुस्तकात , वृत्तांत लेखन, संवाद लेखन सारंश लेखन, पत्रलेखन, मुलाखत लेखन, अस्वाद लेखन व प्रसार माध्यमासाठीचे लेखन इत्यादी प्रकारची चर्चा केलेली आहे. या सर्व लेखन प्रसारा संबंधी अनेक नमुना उदाहरणे देवून हे लेखन कसे आदर्श करावे आणि या लेखनाचे स्वरुप कसे असावे हे ही दाखवून दिले आहे. म्हणून या पुस्तकाच्या प्रस्तावनेत दादा गोरे म्हणतात, " उपयोजीत मराठीत विविध संपर्क माध्यमासाठी लेखन कसे करावे याचे अनेक पातळीवरील नरेंद्र मारवाडे यांनी केलेले विवेचन विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरावे असे आहे. " व्यवहारीक सार्वजनिक जीवनाच्या विविध क्षेत्रात अन्य माध्यमातून विचार नेमक्या व नेटक्या शब्दात प्रभावी पणे प्रकट करण्यासाठी विद्यार्थी मन समर्थ बनवावे हा या अभ्यासक्रमा मागे प्रमुख हेतू . या दृष्टि कार्यालयीन टिप्पणी, बातमी लेखन, जाहीरात मसुदा लेखन, पत्र लेखन, सारंश



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

लेखन इत्यादी लेखन प्रकार आपण अभ्यासत आलो. विविध पातळीवरील ले लेखन पाहिले तर आपल्या असे लक्षात येते की हे लेखन दैनंदिन जीवनात, व्यवहारात उपयोगी असून ते थोडयाशा अभ्यासाने साध्य होणारे आहे, पण आता तेवढयावर थांबून चालणार नाही. बदलत्या काळाचे आवाहने स्विकारुन मराठी भाषेला कसे समृध्द करता येईल हे पाहणे गरजेचे आहे.

मराठी भाषेला व्यवहारीक पातळीवर समर्थ आणि समृध्द करावयाचे असेल तर विद्यालयीन व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात वरिल समाविष्ठ बाबी व्यतिरिक्त आणखीन बऱ्याच बाबीचा समावेश करणे आवश्यक आहे. व्यवसायिक व सार्वजनिक क्षेत्रात त्याची आज गरज आहे. या बाबत ल.रा. नसिराबादकर यांनी " व्यवहारीक मराठी " या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणतात, " व्यवसायीक व सार्वजनिक क्षेत्रात आता पर्वलीचा एकच शब्द ऐकू येत आहे, तो म्हणजे संवाद कौशल्य. जन मानसाशी संवाद साधण्यासाठी बोलो आणि लिहीणे ही महत्वाची भाषकी कौशल्ये होत ती यशस्वीपणे साध्यकेली तर आपण जग जिंकू शकतो. पण या दोन्ही भाषकी कौशल्याचां विचार आजवर महाविद्यालयीन पातळीवरील अभ्यासक्रमांत आलेला नाही. " विद्यार्थ्यांना व्यवसायीक व सार्वजनिक क्षेत्रात वेगवेगळया प्रसंगी म्हणजे कार्यालयीन , व्यवसायीक क्षेत्रातील गटचर्चा, दुरध्वनी वरील संभाषण, सभेतील भाषा निवेदन, सुत्रसंच्यालन, अभिवाचन ,पुनःकथन,कार्यक्रम व्यवस्थापन हे भाषणाविष्कार व त्यासाठी बोलण्याची पुर्वतयारी कसे केली पाहीजे या संबंधीच्या विवेचनाचा अभ्यास क्रमांत समावेश करणे आवश्यक आहे. त्याच बरोबर चरित्र आत्म चरित्र्य, शब्दाचा, प्रासंगित शब्द रचना, शब्द साधना, वाक्य रचना,परिच्छेद लेखन इत्यादी लेखनाची पुर्वतयारी कशी केली पाहिजे, या संबधीचे मार्गदर्शन करणाऱ्या गोष्टीचा अभ्यासक्रमात सकावेश करणे आवश्यक आहे. याचे कारण स्पष्ट करताना ल.रा. मिश्राबादकर म्हणतात, " बोलण्यासाठी असो वा लिहीण्यासाठी शब्द हे मुलभूत द्रव्य असते. पण अभ्यासात तेच अनेकदा अलिप्त राहते म्हणून बोलणे व लिहीणे याभाषीक कौशल्यासाठी त्याचा विचार सोदारण व तपशीलने दोन्ही प्रकरणात वेगवेगळया पध्दतीने केला आहे. बोलणे व लिहीणे ही जशी अभिव्यक्ती कौशल्ये आहेत तसे ती व्यक्तिमत्व विकासाची मुलभूत सामुग्रही आहे. प्रभावी अभिव्यक्तीसाठी या भाषीक कौशल्याचा सराव हवा , हे एक प्रकारे प्रतिभा साधनच म्हणता येइल. "

विचार - भावना, क्रिया-प्रतिक्रीया यांचे प्रकटन प्रथम होते ते भाषेतून म्हणजे बोलण्यात भाषा या शब्दाचा अर्थ बोलणे असेही आहे. आधी भाषा बोलली गेली त्यानंतर लिपीचा शोध लागला याचा अर्थ मानवी समाजात अविष्कार- अभिव्यक्तिचे पहिले माध्यम बोलणे हे आहे. भाषा हे संवादाचे प्रधान माध्यम आहे. म्हणून भाषिक कौशल्याचे स्वरुप व त्याचा आपल्या व्यक्तिमत्वाशी, दैनंदिन जीवनाशी असलेला अतुट संबंध समजावून घेता आले पाहीजे.

मानवी जीवनाची सुरुवात जन्मापासून होते आणि शेवट मृत्यूने होतो. परंतू जन्म आणि मृत्यू या दरम्यान अगदी जन्मा पासून संवादाची प्रक्रीया मानवी जीवनात अव्यहातपणे चालू असते. मानवा प्रमाणे संस्था,समुह या सारख्या घटकामागे संवादाची गरज असते. संवादामुळे विचाराची, मतांची , भावना व कल्पना यांची माहितीची देवाण घेवाण होते. त्यामुळे मानवाच्या कृती, व्यवहार आदि क्रिया प्रतिक्रीया सुलभ होण्यास मदत होते. म्हणून संवादाचे जे मुख्य माध्याम आहे ते म्हणजे आपली मातृभाषा मराठी यांच्या संवगर्धनासाठी, विकासासाठी प्रयत्न करणे मराठी भाषे समोरील आव्हाने कोणती आहेत ते पाहुन समर्थपणे त्या आव्हानाना सामोरे जाणे, मराठी भाषेच्या समर्थनासाठी कोणते उपाययोजना कराव्या लागतात ते उपाययोजना करणे, आणि आपल्या मराठी भाषेची जी गुणवत्ता आहे ते सिध्द करुन दाखवीण्याची आवश्यकता आहे.

मराठी भाषेच्या समर्थनासाठी शासन पातळीवर महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक मंडळ व भाषा संचालनालयाशी निर्मिती करुन शासनाने आजपर्यंत मराठी भाषेच्या विकासाला मोठा हातभार लावलेला आहे. मराठी भाषेत उत्तम साहित्यकृती निर्माण व्हाव्यात, संशोधनाला चालना मिळावी यासाठी शासन अनुदान देते. विशेषतः नवोदित साहित्तीकाच्या पहिल्या कलाकृतीत अनुदान देण्याचे धोरण माराष्ट शासनाने अवलंबीले आहे. या शिवाय मराठी भाषेच्या अभिवृध्दीसाठी कार्य करणाऱ्या दर्जेदार मराठी वड्मयीन मासिकानाही शासन अनुदान देते. येवढेच नवहेतर वेगवेगळया साहित्य संस्था व साहित्य सम्मलने यांना अनुदान देण्याचे कार्यही शासनाने आजपर्यत केलेले आहे. त्यामुळे मराठी भाषेच्या संवर्धनासाठी खुप मोलाचे योगदान शासनाचे आहे.

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी जसे शासनाचे योगदान आहे तसे साहित्यिकांचेही आहे महाराष्ट्राच्या जडणघडणेत व मराठी भाशेचया विकासात साहित्यिकाची भूमिका अतिशय मोलाची आहे. आज जी मराठी भाषा समृध्द स्वरुपात दिसते त्यात साहित्यिकाचा वाटा मोठा आहे. प्राचिन काळापासून आजपर्यतच्या लेखकाकडे दृष्टीक्षेप टाकला की याचा प्रत्यय निश्चित येतो. " माझा मराठाची बोलू कौतूके, परि अमृतातेही पैजा जिंके, ऐसे अक्षरे रसिके मेळविन" असे म्हणून ज्ञानेश्वरानी मराठी भाषेचे महत्व पटवून दिले आहे. संस्कृत भाषेत अडकून बसलेल्या गीततील तत्वज्ञानांला मराठी ( सामान्य माणसाची बोली) भाषेत आणून मराठी भाषेला समृध्द करण्याचे फारमोठे काम केले आहे. म्हणजे ११ व्या शतकापासून मराठी भाषेचया विकासाला साहित्यिकानी सुरुवात केली पुढे अध्यात्मवाद, सुधारणावाद इत्यादी विविध वादातून समृध्द होत गेली. ग्रामीण आदिवासी इत्यादी साहित्याने या परंपरेला बळकटी मिळाली. आणि बोलीचे विविध रुपये या साहित्याने मराठी सारस्वताला दिले. त्यामुळे मराठी भाषा समृध्द होण्यास मोठी मदत झाली. मराठी साहित्यात अनेक लेखकानी लिहून मराठी सारस्वताला समृध्द केले पण आज काळा बदलला आहे. काळानुरुप आपले विचारही बदललले पाहिजेत " जुन ते सोन " म्हणून पारपंपारीकतेला चिटकून न बसता ज्ञानयोग , वज्ञिानयुग , माहितीतंत्रज्ञानाचे युग म्हणून जागतीक पातळीवर माहिती तंत्र प्रचार व प्रसार यामुळे या युगयाने जी क्रांती केली आहे त्या क्रांतीश सुसंगत राहण्या करीता मराठी भाषेने माहिती तंत्रज्ञानाचाही विचार करुन आपल्यात बदल करणे गरजेचे आहे. यात संगणक, इंटनेट, महत्वाच्या



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

संकेतस्थळाचा वापर, भाषा संगणकीकरण इत्यादीचा वापरसुलभतेने मराठी भाषेतून कसा करता येईल याचा विचार करुन त्यात सुधारणा केल्यास व्यवहारात मराठी भाषेचा उपयोग मोठया प्रमाणात व योग्य पध्दतीने होवून माराठी भाषा समृध्द होईल व या माहिती तंत्रज्ञाना युगातील मराठी सारस्वताचा पताका कुणालाही न डगमगता स्वाभीमानाने फडकत राहील अशी मला निश्‍चित आशा वाटते .

संदर्भग्रंथ .


१. व्यवहारीक मराठी :- ल.रा. नसिराबादकर.

२. उपयोजित मराठी :- प्रकाश मेदनकर

३. व्यवहारीक मराठी :- डॉ. लिला गोवालीकर,डॉ.जयश्री पाटणकर

४. व्यवहारीक मराठी :- डॉ.कल्याण काळे व दत्तात्रय पुंडे

५. उपयोजित मराठी :- उत्तर महाराष्ट विद्यापीठ

६. व्यवहारिक मराठी,स्वरुप व मिांसाः- प्रा.वंसत बिराजदार

७. ७.वस्तुनिश्ठ आकलन व उपयोजित मराठी लेखन :- प्रा.नरेंद्र मरावाडे.


Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad